# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३२१ - २३ दिनांक : - १८/०९/२०२३

## बाथरुमच्या खिडकी व्दारे प्रवेश करुन घरफोडी चोरी करणा-या विधीसंघर्षग्रस्त बालका कडुन ३.१६ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने हस्तगत करण्यात गुन्हे शाखा कक्ष -3 विरार यांना यश

दिनांक- २५/०८/२०२३ रोजी दूपारी १२.१५ वाजता ते दुपारी ०२.०० वाजताचे सुमारास फिर्यादी नामे - वय ५० वर्षे, रा बोळीज विरार प.ता-वसई,जि-पालघर या त्यांचे घरगुती कामाकरीता बाहेर गेले असताना अज्ञात चोरटयाने फिर्यादी याचे घराचे बाथरुमचे खिडकीवाटे आत प्रवेश करून लोखंडी कपाटातील तिजोरी तोडुन त्यातुन ३,६२,०००/- रुपये किंमतीचे सोन्या, चांदीचे दागीने व रोख रक्कम असे दिवसा घरफोडी चोरी करुन नेले बाबत अर्नाळा सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर व कलम २९१/२०२३ भा.द.वी.सं कलम ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिण्यापासुन चोरी व घरफोडीच्या गुन्हयात वाढ झाल्याने सदर घटनांची मा. वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या

सदर गुन्हे अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व आदेशान्वये गुन्हयाचा समांतर तपासादरम्यान घटनास्थळावरील उपलब्ध सि.सि.टी.व्ही. फुटेज मध्ये संशयीत आरोपीत निष्पन्न करुन तांत्रीक विश्लेषण व मिळालेल्या गोपणीय बातमीवरुन विधीसंघर्षग्रस्त बालक याचे कब्जातुन गुन्हयात चोरीस गेलेल्या माला पैकी ३,१६,०००/- रुपये किंमतीचे ७२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने हस्तगत करण्यात आले आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक / प्रमोद बडाख, पोउपनिरी/ अभिजित टेलर, उमेश भागवत, पोहवा/ अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं./ राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब/ प्रविण वानखेडे, गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष -३ तसेच सफौ/ संतोष चव्हाण नेम सायबर सेल यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

**----0000----**